म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का वा.
दा. क्र. ६३२८




RRMRBK-0204328

कै. विजया मुतालिक हिचे स्मरणार्थ
कुमार किरण सीताराम प्रधान
भाचे
२-९-१९६२

# नाटकांच्या गोष्टी : २

# शा र दा

गोविंद बल्लाळ देवल ह्यांच्या
'शा र दा' नाटकाची गोष्ट

पुरुषोत्तम रामचंद्र लेले

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई
RRMRBK-0204328

मूल्य आठ आणे

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

पहिली आवृत्ति : २१ जानेवारी, १९५३

मुद्रक :
वा. ग. ढवळे,
कर्नाटक मुद्रणालय, चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक :
केशव भिकाजी ढवळे,
कर्नाटक हाउस, चिराबाजार, मुंबई २

# नांदी

संगीत नाट्यसृष्टींत किर्लोस्करांच्या मागोमाग नांव घेतलें जातें तें देवलांचें. सौभद्र नाटकाप्रमाणेंच आजतागायत आपली लोकप्रियता टिकवून धरणारें नाटक म्हणजे शारदा. सन १८९९ सालीं शारदा नाटकाचा पहिला प्रयोग झाला, तो किर्लोस्कर संगीत मंडळीनें केला. त्यानंतर अनेक कंपन्यांनीं ह्या नाटकाचे प्रयोग केले. तालुकानिहाय आणि खेडोपाडींसुद्धा शारदा नाटकाचे प्रयोग झाले. हल्लीं धंदेवाईक नाटकमंडळया जवळजवळ नामशेष झाल्यानंतर हौशी नटांचे संच शारदा नाटकाचे प्रयोग करतात. शारदा नाटकाच्या काळची परिस्थिति आज नाहीं, अगदीं एका लहानशा समाजांतील दृश्य ह्या नाटकांत दाखवलें आहे, तरीसुद्धा सर्व पातळींतील प्रेक्षक हें नाटक उत्सुकतेनें आणि कौतुकानें पाहातात, इतकें हें परिणामकारक नाटक आहे.

देवल आणि किर्लोस्कर ह्यांचा संबंध फार पूर्वीपासूनचा, म्हणजे देवल शिष्य आणि किर्लोस्कर गुरु असा असल्यामुळें अण्णासाहेब किर्लोस्करांनीं संगीत मंडळी स्थापन केल्याबरोबर देवलांचाही त्या संस्थेशीं संबंध आला. प्रथम ज्या वेळीं संगीत शाकुंतल रंगभूमीवर आलें, त्या वेळीं शकुंतला गाणारी नव्हती. 'तुझें मन तें ठाऊक मला नाहीं' ह्या एका दिंडीशिवाय शकुंतलेला पदें नव्हतीं, कारण जे शंकरराव मुजुमदार तें काम करीत त्यांना गाणें येत नव्हतें. पुढें भाऊराव कोल्हटकर कंपनींत आले आणि मुख्य स्त्रीभूमिका करूं लागले, तेव्हां शकुंतलेसाठीं पदें करावीं लागलीं. शकुंतलेचीं पदें देवलांनीं केलीं आहेत, ह्यावरून देवलांचा किर्लोस्कर कंपनीशीं संबंध किती घनिष्ठ होता हें समजतें. नंतर ज्या वेळीं अण्णासाहेबांनीं 'रामराज्यवियोग' नाटक लिहिलें त्या वेळीं तालमी घेण्याचें काम देवलांकडेच आलें. तेव्हांपासून जोंपर्यंत देवल कंपनींत होते तोंपर्यंत नाट्यशिक्षक म्हणून देवलच काम करीत. 'देवलमास्तर' हेंच त्यांचें नांव सर्वांना परिचित होतें.

अण्णासाहेब किर्लोस्कर दिवंगत झाल्यानंतर देवल हेच किर्लोस्कर कंपनीचे नाटककार झाले. विक्रमोर्वशीय, मृच्छकटिक आणि शापसंभ्रम हीं संस्कृतवरून घेतलेलीं नाटकें त्यांनीं किर्लोस्करांना लागोपाठ लिहून व बसवून दिलीं.

ह्यांपैकीं विक्रमोर्वशीय नाटकांत भाऊराव स्त्रीभूमिका करीत. पुढें त्यांनीं स्त्रीभूमिका सोडून दिल्या. मृच्छकटिक नाटकांत 'चारुदत्त' आणि शापसंभ्रम नाटकांत 'पुंडरीक' ह्या नायकांच्या भूमिका त्यांनीं केल्या. स्त्रीभूमिकांपेक्षांही भाऊरावांनीं नायकांच्या भूमिका करून अधिक कीर्ति मिळवली. अशा ह्या अलौकिक नटाला हाताशीं घेऊन देवलांनीं 'शारदा' हें स्वतंत्र आणि त्यांतल्या त्यांत सामाजिक सुधारणावादी नाटक रंगभूमीवर आणलें. सुरुवातीपासूनच तें नाटक लोकप्रिय व परिणामकारक झालें हें इतिहासांत नमूद आहे.



भाऊराव कोल्हटकर

देवलांची नाट्यसेवा नाटक लिहिण्यापुरती मर्यादित नाहीं. ते अत्यंत कुशल व प्रभावी नट होते. भाव दाखविण्यास अत्यंत अनुकूल असा त्यांचा चेहेरा होता. किर्लोस्कर संगीत मंडळीच्या पूर्वीं स्थापन झालेल्या 'आर्योद्धारक नाटक मंडळी'मध्यें त्यांनीं झुंझारराव, अश्वत्थामा व गौतमी (स्त्री) अशा भूमिका अत्यंत यशस्वीपणें केल्या होत्या. त्यांतल्या त्यांत त्यांची झुंझाररावाची भूमिका पाहिलेले अनेक लोक प्रस्तुत लेखकाला भेटले असून ते त्या भूमिकेची एकमुखानें तारीफ करीत. शिवाय, देवल उत्तमपैकीं नाट्यशिक्षक होते. कांहीं माहितगारांच्या मतें देवलमास्तरांसारखा नाट्यशिक्षक झालाच नाहीं. जसे भाऊराव कोल्हटकर किंवा गणपतराव जोशी आपापल्या क्षेत्रांत अद्वितीय होते, तसेच देवलमास्तर नाट्यशिक्षणाच्या क्षेत्रांत अद्वितीय होते. स्वाभाविकपणा हा त्यांच्या शिकवण्यांतील विशेष होता. अशाप्रकारें नाटक लिहावयास लागणारी सर्व अनुकूलता त्यांना होती. कोणतीही घाई मागें लागलेली नव्हती. पात्रें डोळ्यांपुढें होतीं. लोकांची संगीताची आवड देवलांना माहीत होती आणि तिला वेठीस कसें लावावें हें त्यांना पूर्णपणें अवगत होतें.

अगदीं जुन्या मताच्या लोकांनासुद्धा म्हाताऱ्याचें बालिकेशीं लग्न नापसंत होतें. सामाजिक सुधारणा ज्यांच्या गांवींसुद्धा नव्हती त्यांना बालिकेशीं विवाह करावयास सजणाऱ्या म्हाताऱ्याचा निषेध प्रिय होता. म्हाताऱ्या माणसाची टिंगल ही सर्वांनाच प्रिय असते. म्हातारेसुद्धा दुसऱ्या म्हाताऱ्याची टिंगल

करावयास सज्ज असतात. त्यांतून बालिकेशीं विवाह करून तिच्या जन्माचा सत्यानाश करावयास सरसावलेला म्हातारा, मग त्याची फजिती सर्व प्रेक्षकांस व प्रेक्षकेतर समाजास आवडली ह्यांत काय नवल !

असा लोकप्रिय विषय आणि देवलांसारखा रंगभूमीसंबंधीं सर्व खुब्या जाणणारा तज्ज्ञ — मग मणिकांचनयोग झाला ह्यांत काय आश्चर्य ! देवलांची भाषा अतिशय लवचिक आणि वैचित्र्यपूर्ण. पदांची रचना लालित्यपूर्ण आणि अगदीं सरळ — कोणाच्याही तोंडीं बसतील अशा चाली, कोणालाही सहज समजतील व उच्चारतां येतील असे शब्द, अशा ह्या गुणसमुच्चयापुढें अपयशाचा काय पाड !

कोदंडाला भरपूर पदें — पहिल्या अंकांतच साक्या — दिंड्या मिळून बारा पदें — आणि तीं म्हणणारा भाऊराव कोल्हटकरांसारखा देखणा, सुरेल आणि लोकप्रिय नट. श्रीमंताचीं पदें म्हणावयास फक्त भाऊरावांपेक्षां कमी दर्जाचा असा काका मिरजकरांसारखा मधुर आवाजाचा नट. इंदिराकाकूचें काम करावयास अनुभवी आणि स्पष्ट व गोड वाणीचा कृष्णराव गोऱ्यांसारखा नट. एवढीं मोहरीं असल्यावर यश येणार नाहीं कसें ?

नाटक हें टीकाकारांच्या समाधानाकरतां नसतें, माणसांच्या समाधाना-करतां असतें. देवल हे अत्यंत व्यवहारी, कणखर आणि स्वतःच्या हक्कासाठीं जागृत असे होते. स्वतः ‘भावनाविवश’ नव्हते, पण त्यांना भावना वश होत्या. अंतःकरणाला पीळ तरी पाडला पाहिजे किंवा हेलकावे तरी दिले पाहिजेत, तर नाटक यशस्वी होतें हें देवल जाणत होते. भावना आणि रस ह्या दोहोंच्या जोरावर नाटकें यशस्वी होतात; आणि ह्या दोहोंचेंही माप शारदा नाटकांत देवलांनीं पुरेपूर ओतलें आहे. शारदेच्या द्वारा करुणरस आणि भुजंगाच्या द्वारा हास्यरस नाटकांत रंगवलेला आहे. ‘तूं टाक चिरुनि ही मान’ आणि ‘सदय शांत असली मरणा’ हीं दोन पदें म्हणजे करुणरसाची परमावधि आहे. तसेंच ‘अवघें पाउणशें वयमान’ आणि ‘जरठास तरुण हो स्त्री जरी’ हीं दोन पदें म्हणजे उपहासाची परमावधि आहे. मुलीमुलींनीं केलेलें हळदीकुंकू ह्या नाटकाचें जीवनसत्त्व आहे असें म्हटलें तरी चालेल. कोदंडाच्या भाषणांत वीररस आणि त्यागवृत्ति ह्यांचेंही माप ओतलें आहे.

प्रयोगदृष्ट्या यश देईल असें नाटक लिहिण्यांत देवलांचा हातखंडा होता. ह्या नाटकाचें कथानक एकसारखें पुढें चालत असतें, त्यामुळें प्रवाह कोठेंही खंडित होत नाहीं. प्रेक्षकांना काय आवडेल हें ओळखून तें त्यांना पुरविल्यानंतर प्रेक्षक कमलावराप्रमाणें अनंत हस्तांनीं उदार आश्रय द्यावयास कांकूं काय म्हणून करतील ?

शारदा नाटकाचें वैशिष्ट्य असें आहे कीं साधारण नटनटींनासुद्धा त्याचा प्रयोग करतां येतो. 'जयकृष्णा०' आणि 'मी समजुं०' हीं दोन पदें वगळतां बाकी बहुतेक पदें साधारण गाणारालासुद्धा म्हणतां येतील अशीं आहेत. खेडोपाडीं हीं पदें लोक म्हणत असत. कोदंडाचीं पदें तर अशीं आहेत कीं कुशल गाणाराला त्यांत आपलें कौशल्य दाखवतां येतें, आणि अगदीं सामान्य गायकालाही तीं गातां येतात. नाटक लोकप्रिय व्हावयास लागणारे सगळे गुण एका नाटकांत पाहावयाचे असतील तर 'शारदा' पाहा.

नाटकांतील संवाद मुळांतून जसेच्या तसे घेतले आहेत ते निराळे ओळखतां यावे म्हणून लहान टाइपांत छापले आहेत. ह्या मालेंतील सर्व पुस्तकांत हाच नियम पाळला जाईल.

पु. रा. लेले

३१-१-१९५३

## गोविंद बल्लाळ देवल



गोविंद बल्लाळ देवल ह्यांचा जन्म सांगलीजवळ हरिपूर गांवीं ता. १३ नोव्हेंबर १८५५ रोजीं झाला. लोकमान्य टिळकांपेक्षां ते जवळजवळ नऊ महिन्यांनीं मोठे होते. ह्यांचें अण्णासाहेब किर्लोस्करांशीं गुरुशिष्याचें नातें होतें. देवल बेळगांवच्या सरदार हायस्कूल-मध्यें विद्यार्थी होते आणि किर्लोस्कर शिक्षक होते. कोल्हापूरच्या राजाराम हायस्कुलांत ते नंतर दाखल झाले आणि मॅट्रिकच्या परीक्षेस ते राजाराम हायस्कूलचे विद्यार्थी म्हणूनच बसले. मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यानंतर देवलांनीं बेळगांवच्या सरदार हायस्कूलमध्यें शिक्षक म्हणून काम केलें. कांहीं कारणानें ती नोकरी सोडून देवल कोल्हापूरच्या शाहू छत्रपतींचे खाजगी शिक्षक म्हणून राहिले.

ती नोकरी सोडून देवल पुण्यास गेले आणि शेतकी कॉलेज-मध्यें शिकले. त्यांना त्या विषयाचा डिप्लोमा १८८४ सालीं मिळाला व पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिक्षकाची नोकरीही मिळाली. ही नोकरी त्यांनीं १८८७ सालीं सोडली आणि तेव्हांपासून लेखन ह्या एकाच व्यवसायास त्यांनीं स्वतःला वाहून घेतलें.

प्रथम 'पुणेंवैभव' ह्या वर्तमानपत्रांत स्फुट व राजकीय लेख त्यांनीं लिहिले व 'कादंबरीकलाप' ह्या मासिकाचें संपादन केलें. रेनॉल्ड्सच्या 'मिस्टरीज ऑफ लंडन' ह्या ग्रंथाच्या पहिल्या भागाचें भाषांतरही त्यांनीं केलें. पण त्यांचें मुख्य लिखाण म्हणजे नाटकें;

आणि त्यांचें नांव मराठी वाङ्मयांत चिरकाल टिकणार तें नाटककार म्हणूनच होय.

त्यांनीं १८८६ पासून १८९९ पर्यंत एकंदर सात नाटकें लिहिलीं. त्या नाटकांचीं नांवें : ( १ ) दुर्गा ( २ ) विक्रमोर्वशीय ( ३ ) मृच्छकटिक ( ४ ) झुंझारराव ( ५ ) फाल्गुनराव ( ६ ) शापसंभ्रम ( ७ ) शारदा. ह्यांपैकीं दुर्गा, झुंझारराव व फाल्गुनराव हीं गद्य असून, विक्रमोर्वशीय, मृच्छकटिक, शापसंभ्रम व शारदा हीं संगीत नाटकें आहेत. ' फाल्गुनराव ' ह्या नाटकांत संगीताची भर घालून ' संशयकल्लोळ ' हें नाटक तयार करण्यांत आलें आणि तें रंगभूमीवर सन १९१६ सालीं आलें.

देवलांचीं पांच नाटकें अतिशय लोकप्रिय झालीं. फक्त ' विक्रमोर्वशीय ' आणि ' दुर्गा ' हीं नाटकें लोकप्रिय होऊं शकलीं नाहींत. ' संशयकल्लोळ ' चे प्रयोग अलीकडेसुद्धा अनेक ठिकाणीं होतात. तसेंच ' शारदा ' आणि ' मृच्छकटिक ' ह्या दोन नाटकांचेही प्रयोग हल्लीं होतात. हल्लीं ' संशयकल्लोळ ' च्या खालोखाल ' शारदा ' नाटकाचे प्रयोग होतात. सात नाटकांत फक्त ' शारदा ' हें एकच स्वतंत्र नाटक आहे. बाकीचीं भाषांतरें किंवा रूपांतरें आहेत.

शारदा नाटकांत कोदंडाची भूमिका कै. भाऊराव कोल्हटकर करीत आणि कै. कृष्णराव गोरे इंदिराकाकूची भूमिका करीत. नटीची भूमिकाही कृष्णराव गोरेच करीत.

देवल मिरज येथें ता. १४ जून १९१६ रोजीं मृत्यु पावले.



# ईश चिंता निवारील सारी

गंगापूरच्या सुदामशेट नांवाच्या म्हाताऱ्या सावकाराचें संगमपूरच्या एका बारा-तेरा वर्षांच्या मुलीशीं लग्न झालें; त्या लग्नासाठीं गंगापूरच्या कांहीं मुली संगमपुरीं आल्या होत्या. त्या परत जाण्यापूर्वीं संगमपूरच्या प्रसिद्ध संगमनाथाच्या देवळांत दर्शनासाठीं निघाल्या होत्या. त्या वेळीं त्यांनीं त्या लग्नाबद्दलचा आपला तिरस्कार बोलून दाखवायची संधि साधली.

**मंदाकिनी :** त्या गेल्या ना ? आतां मोकळेपणानें बोलायला कांहीं भीति नाहीं. खरंच सांगा, इतका जख्खड म्हातारा नवरामुलगा कधीं जन्मांत तरी पाहिला होता का ?

**वल्लरी :** भलतंच कांहीं तरी तुझं बोलणं ! अग तो म्हणजे चांगला सुरेख, देखणा, तरणा, सगळा सत्तर वर्षांचा नवरदेव ! त्याला का तूं म्हातारा म्हणतेस ?

**त्रिवेणी :** काय मेला नवरदेव ! त्याचं लगीन झालं, पण बाई त्या पोरीचं पाप उभं राहिलं.

**मंदाकिनी :** तुझे बाबा सांगत होते, ऐकलंस का शारदे, सांगत होते, कीं नवरामुलगा बिजवर आहे खरा, पण वयानें कांहीं मोठा नाहीं.

वल्लरी : शारदेचे बाबा ना? अग, ते सुदाम सावकाराचे आमच्या गांवांतले क्षेत्रोपाध्ये, त्यांना तो कसा मोठा दिसेल? लहानच दिसायचा. त्यांतून त्यांनीं शारदेला चौदा वर्षांची वाढवली आहे, तेव्हां त्यांच्या मनांतून बहुतकरून असाच, एखादा पिकलेला तरुण नवरा... पण मी कशाला बोलूं बाई?

जान्हवी : शारदे, मी म्हणतें हा सुदाम सावकार म्हातारा तो म्हातारा, पण रूपानें तरी बरा असायचा होता! मुंडावळ्या बांधून बसला होता, तेव्हां कसा दिसत होता पाहिलात ना? अहाहा! दृष्ट काढावी बाळाची. काजळाचीं पुटं दिलेला कोळसाच जसा कांहीं! आणि चालत होता कसा, पाहिलात का?

शारदा : त्या मेल्याची आठवण सुद्धा नको. मंगळाष्टकं झाल्यावर जोश्यानें अंतरपाट काढून घेतलान् तेव्हां होतीस का तूं? होतीस का नर्मदे? काय सांगूं तुम्हांला, नवऱ्यामुलीनें असं वर तोंड करून पाहिलंन् मात्र आणि झालं बाई!

बघुनि त्या भयंकर भूता, फोडिली तिनें किंकाळी।
या हृदया चरका बसला, कळवळे मनहि त्या काळीं।
परि बाप तिचा तो कसला, चांडाळ पूर्विंचा वैरी।
तिळभरही द्रवला नाहीं, उलट त्या बिचारिस मारी।
ती दीन भयाकुल मुद्रा रात्रंदिन दिसते बाई।
रडविलें तिनें मज कितिदां दचकतें भिउनि शयनींहि ॥ १ ॥

वल्लरी : देवा, नको रे हा मेला पोरीचा जन्म! आपल्या पोटच्या पोरीवर त्या बापाचा हात उचलला तरी कसा म्हणतें मी!

तुंगा : शारदे, आम्हांला कांहीं भीति नाहीं; तूं मात्र संभाळ ग बाई. तुझ्या बापाच्या मनांतून असंच कांहीं आहे म्हणून माझी आई परवां म्हणत होती.

शारदा : भलतंच कांहीं तरी! माझे बाबा असे उलट्या काळजाचे नाहींत, आणि कदाचित् त्यांच्या मनांत तसं आलं समज, तरी पण माझी आई आहे ना!



कोदंड : ईश चिंता निवारील सारी ।
भाव निश्चल मनें ठेविं तूं त्यावरी ॥

**मंदा :** तें सगळं खरं. पण बाई, ह्या पैशाच्या पायीं...( कोदंड येतो. त्याच्याकडे पाहून ) अगबाई, हे कोण ?

**कोदंड :** मुलींनो, भिऊं नका. मी एक पांथस्थ ब्रह्मचारी आहें. तुमचं संभाषण मीं ऐकलं म्हणून विचारतों, तुम्ही कोणत्या गांवच्या ?

**मंदा :** आम्ही सर्व गंगापूरच्या. आज परत जायचं, म्हणून देवदर्शनासाठीं इकडे आलों.

**कोदंड :** ह्या शारदेच्या बापाच्या मनांतून तिला वृद्ध वराला द्यायची आहे, असं हिनें म्हटलं तें खरं का ?

**मंदा :** हो, असं म्हणतात. मींसुद्धा ऐकलं होतं हें आणि हें ऐकल्या-पासून शारदेला देखील चिंता लागल्यासारखी दिसते. आपण सत्पुरुष दिसतां, तेव्हां तिचीं चिंता दूर होईल असा कांहीं उपाय आपण तिला सांगावा. शारदे, त्यांना नमस्कार कर. ( शारदा नमस्कार करते. )

**कोदंड :** अनुरूपवरप्राप्तिरस्तु ! शारदे, तूं अगदीं भिऊं नकोस.

**ईश चिंता निवारील सारी । भाव निश्चल मनें ठेविं तूं त्यावरी ॥**

आतां मी जातों. पण तुम्हां सर्व मुलींना माझं एवढंच सांगणं आहे कीं —

**जागृत ठेवा लग्नाची ही स्मृति सारी ॥ ध्रु० ॥**
**व्हालचि माता दुहितांच्या कधितरी संसारीं ।**
**होउं न द्यावा तुम्हि त्यांचा विक्रय बाजारीं ॥ १ ॥**

**गाडीवान :** गाड्या नदीपल्याड जाऊनशेनी वाढूळ झाला, चलावं शारदाबाई ! अव तिरवनीबाई, चला चला बेगी बेगी.

**त्रिवेणी :** खरंच का गाड्या नदीपलीकडे गेल्या ? कां कांहीं तरी सांगतोहेस आपलं ?

**गाडीवान :** ह्यो बघा दिस डोईवर आला अक्षी. चला बेगी.

**वल्लरी :** अग बाई खरंच ! चला तर, देवदर्शन घेऊन चालायला लागूं या, नाहींतर त्यांच्याशीं गांठ आहे. बोलून बोलून पुरे करतील अगदीं.

♣



# धाना हुगति आति तीच तुम्ही रे

सुदाम सावकाराचें म्हातारपणींसुद्धा एका बालिकेशीं लग्न झालें हें पाहून संगमपूरच्या भुजंगनाथ नांवाच्या म्हाताऱ्यासही लग्न करण्याची तीव्र इच्छा झाली. सुदाम सावकार आणि भुजंगनाथ हे सारख्याच वयाचे होते. संगमपुरीं भद्रेश्वर दीक्षित नांवाचा ब्राह्मण लग्नें जुळविण्याचा धंदा करीत असे. सुदाम सावकाराचें लग्न जुळवून देण्यांत त्याला चांगला लाभ झाला होता. त्याच्यापेक्षांही मोठा गड्डा भुजंगनाथाला बनवून मिळवितां येईल असें भद्रेश्वरानें हेरलें आणि त्याप्रमाणें त्यानें आपली अक्कलहुशारी वापरून एक कारस्थान रचलें. भद्रेश्वरानें प्रथम एका ज्योतिषीबुवाला भुजंगनाथाकडे पाठविलें आणि त्याच्याकडून भुजंगनाथाला ‘ यंदा भार्यायोग आणि पुढच्याच वर्षीं पुत्रयोग आहे ’ असें भविष्य ऐकविलें. भुजंगनाथाला मुळांत लग्नाची इच्छा होतीच. सुदाम सावकाराच्या लग्नानें ती थोडीशी बळावली आणि ह्या जोशीबुवांच्या भविष्यवाणीनें तर ती चांगलीच जोराला लागली. एवढी पूर्वतयारी करून भद्रेश्वरानें भुजंगनाथाची

भेट घेतली आणि त्याचें लग्न लावून देण्याचें अंगावर घेतलें. सुदाम सावकाराकडून जी द्रव्यप्राप्ति झाली त्यापेक्षां हजार पांचशें जास्त दक्षिणा देण्याचें भुजंगनाथानें कबूल केलें. इतकें जमल्यानंतर भद्रेश्वरानें त्याला सांगितलें कीं त्याच्या म्हातारपणाचा संगमपूरच्या आसपास इतका बोभाटा झाला होता कीं त्याला जवळपासची मुलगी मिळणें शक्य नव्हतें. संगमपूर सोडून शंभर कोसांवर गेल्यास आपला कार्यभाग साधेल ! मात्र जायचें तें श्रीमंत, सरदारी थाटानें गेलें पाहिजे ! बरोबर आचारी, पाणक्ये, आश्रित, पुराणिक, अशा सरंजामासहित गेल्यास कार्यभाग नक्की साधेल. भुजंगनाथानें थोडा वेळ कांकूं केलें. पण अशा थाटानें जायचें नसेल तर लग्नाचा नाद सोडा असा रोखठोक जबाब दीक्षितानें दिल्याबरोबर लग्नाला उतावीळ झालेला भुजंगनाथ जरूर तेवढ्या इतमामानें जाण्यास व त्यासाठीं लागणारा सर्व खर्च करण्यास तयार झाला. लगेच त्यानें खर्चाला लागणारी रक्कमही भद्रेश्वराच्या स्वाधीन केली.

भद्रेश्वरानें आपल्याबरोबर ‘कोदंड’ नांवाचा एक तरुण ब्रह्मचारी ‘पुराणिक’ म्हणून घेतला. हा कोदंड तीन वर्षेपर्यंत शंकराचार्यांच्या आज्ञेवरून जरठकुमारीविवाहाचा निषेध करीत फिरत होता. सुदाम सावकाराच्या लग्नाच्या सुमारास तोही संगमपुरास आला होता आणि त्यामुळेंच त्याच्या नजरेस गंगापुरीच्या शारदा, वल्लरी, इत्यादि मुली पडल्या. ह्या कोदंडाचा हिरण्यगर्भ नांवाचा एक मित्र होता. भद्रेश्वर दीक्षिताचें कारस्थान त्यांना समजल्यावर तें हाणून पाडण्याकरतां दोघेही त्याच्या गोटांत शिरले. कोदंड पुराणिक म्हणून राहिला आणि हिरण्यगर्भ

'शामसुंदर' हें नांव घेऊन भुजंगनाथाच्या खास दिमतीला राहिला. भुजंगनाथाच्या स्वारीबरोबर हेही निघाले.

दीक्षितानें ह्या सगळ्या लवाजम्यासह भुजंगनाथाला गंगापुरीं आणिलें. तेथें व्यवस्थित वळण बांधून त्यांनीं तेथील सरकारी हेरंब महालांतच ठाणें मांडलें. 'मंडलेश्वरकरांचे सापत्न बंधु जयधुंडिराज' असें भुजंगनाथाचें भपकेबाज नांव त्यांनीं जाहीर केलें. विद्वान्, शास्त्री, हरदास, पुराणिक, अशांची योग्य संभावना, तसेंच दानधर्म, अन्नसंतर्पण, इत्यादिकांची गर्दी करून भुजंगनाथाच्या औदार्याचा दीक्षितानें चोहोंकडे डंका वाजविला. त्या गांवीं कांचनभटाची शारदा नांवाची चौदा वर्षांची सुंदर मुलगी लग्नाची होतीच. तिला सुदाम सावकाराच्या लग्नाच्या वेळीं भद्रेश्वरानें पाहिलीही असेल. त्या कांचनभटाची द्रव्यलोभाबद्दल ख्याति होती. सुवर्णशास्त्री ह्या नांवाचा एक भिक्षुक त्याचा स्नेही होता. ह्या सुवर्णशास्त्र्याला हाताशीं धरून भद्रेश्वरानें कांचनभटाला गांठलें. 'मुलगी दिल्यास हुंडा म्हणून पांच हजार रुपये, शिवाय श्रीमंतांचे श्वशुर म्हणून वंशपरंपरेनें तैनात' देण्याचें आमिष दिसल्याबरोबर 'कवडी कवडी' जमवणारा कांचनभट भाळला आणि भद्रेश्वरास आपलें कारस्थान पुरें होण्याचीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं.

शारदेची आई इंदिराबाई मुलीच्या लग्नाच्या विवंचनेंत होती आणि ती आपल्या नवऱ्याला एकसारखें टुमणें लावीत असे. एके दिवशीं ती स्वतःशींच जळफळत असतांना कांचनभट अगदीं वीरश्रीच्या अवसानांत घरीं आला.

**कांचन :** जयंता, अग शारदे !

**इंदिरा :** ती आतां इतक्यांत जयंताला घेऊन गंगेवर अंग धुवायला गेली आहे.

**कांचन :** पण तूं आहेस ना ? झालं तर. अशी इकडे ये पाहूं.

**इंदिरा :** ही आलें, कां ?

**कांचन :** मला किती दिवस एकसारखीं टुमणीं लावलीं होतीस, कीं पोरगी वाढत चालली, तिला स्थळ नाहीं का पाहायचं, लोक हसतात; असं न् तसं, हजार गोष्टी. तेव्हां मी तुला काय सांगत होतों, कीं आमची शारदा मोठी दैववान् पोरगी आहे, तिचा नवरा आपोआप घरीं चालून येईल, तूं काळजी करूं नको, असं सांगत होतों ना ?

**इंदिरा :** तसं आज कांहीं झालं आहे वाटतं ? खरंच आला आहे का कुणी ?

**कांचन :** आला आहे ? लोटांगण घालीत येईल लोटांगण ! आमची मुलगीच तशी आहे. म्हणूनच आपण हुंडा न भरतां उलट मुलीला हुंडा देणारं पालखीपदस्थाचं स्थळ आपण होऊन चालत आलं आहे. आतां कसं काय ?

**इंदिरा :** दुधांत साखर पडल्यासारखंच झालं. पण ही सगळी थट्टा दिसते आहे मला.

**कांचन :** शिवाय आम्हांला श्वशुर म्हणून वर्षाची पांचशें रुपयांची नेमणूक, ऐकलंस का ?

**इंदिरा :** आतां मात्र ही खास थट्टा. नाहींतर एखादं मेलं श्रीमंत थेरड्याचं स्थळ असेल. तसं असेल तर नाहीं हो द्यायची माझी मुलगी तसल्या म्हाताऱ्याला !

**कांचन :** तूं द्यायची नाहींस आणि मी देईन का ? माया काय ती तुम्हांलाच वाटतं ? आतां असं पाहा, म्हातारा नवरा आपल्या शारदेला नको, हें कबूल. पण अगदीं तरुणही चालायचा नाहीं. तिला शांत, पोक्त, विचारी असा नवरा पाहिजे. शास्त्रच आहे, ऐक : 'चतुर्दशवर्षकन्यां, पंचतीसोत्तमो वराः ।' हें कांहीं मी माझ्या पदरचं सांगत नाहीं. चौदा वर्षांच्या मुलीला पसतीस वर्षांचा वर उत्तम आणि शारदेचं वय चौदा वर्षांचं आहे.

इंदिरा : म्हणजे, माझ्या पोरीला पसतीस वर्षांचा नवरा ? नको ग बाई, जाळा तीं तुमचीं शास्त्रं न् ते अनुभव.

कांचन : हेंच तें, धोरण कमी म्हणतों तें हेंच ! शास्त्रवचन सांगितलं तुला. बरं, पण अजून पोरगी कशी येत नाहीं ? आतां तिला पाहायला ते दीक्षित यायचे आहेत.

जयंत व शारदा स्नान करून परत आलीं. इतक्यांत एका शिपायानें येऊन वर्दी दिली कीं दीक्षित व सुवर्णशास्त्री शारदेला पाहायला आले. शारदा स्वरूपानें देखणी होती, त्यामुळें तिला पाहाण्याचें काम शिष्टाचार म्हणून करायचें होतें. नंतर पत्रिका पाहिली, तीही भुजंगनाथाच्या पत्रिकेशीं जुळणारी निघाली. नंतर दीक्षितानें कांचनभटाचें गोत्र विचारलें, तें काश्यप गोत्र निघालें. भुजंगनाथाचें गोत्रही काश्यपच होतें. पण दीक्षित असल्या अडचणीमुळें हें स्थळ सोडणारा नव्हता. त्यानें जसें नांव, गांव, दर्जा बदलला, तसें गोत्रही बदललें. नंतर रिवाजाप्रमाणें शारदेला एक शेलारी, चोळीचा खण आणि खाऊचा पुडा दिला. जयंतालाही एक खाऊचा पुडा त्यानें दिला.

दीक्षित : काय भटजी, हा संबंध आतां ठरला असं मानायला कांहीं चिंता नाहीं ना ?

कांचन : चिंता नाहीं, पण एकदा आंत जाऊन विचारून येतों. (जातो.)

सुवर्णशास्त्री : हें ढोंग आहे, उगीच चंद्रबळ आणतो आहे झालं.

दीक्षित : तें मीं ओळखलंच, पण बायको विघ्न आणण्यासारखी नाहीं ना ?

शास्त्री : विघ्न आणायला लागली, तर तिलाही एखादा ठसठशीतसा दागिना द्यायचा केला, म्हणजे पडते समजूत. बायकांचं वर्म म्हणजे दागिने. ( कांचनभट येतो ) काय भटजी, पडला का रुकार ?

**काचन :** पडलाच म्हणायचा. पण एक वार श्रीमंतांना पाहून येण्याचा आग्रह आहे. बायकांची समजूत, मीं सांगितलं पाहून येतों म्हणून.

**दीक्षित :** कांहीं वावगं नाहीं. चला तर; का शास्त्रीबोवा ?

**शास्त्री :** हो, म्हणजे शिष्टाचारही झाला आणि शंकानिरसनही झालं. यांतून, आंतली शंका !

**दीक्षित :** मी पुढें जातों. शास्त्रीबोवा, तुम्हीच ह्यांना घेऊन हेरंब महालांत या.

ही भद्रेश्वर दीक्षिताच्या परीक्षेची वेळ होती. कारण कांचनभट भुजंगनाथाला जवळून पाहाण्याच्या संभव होता आणि त्याच्या लक्षांत भुजंगनाथाचें म्हातारपण आलें असतें. तो लगबगीनें हेरंब महालांत आला आणि त्यानें भुजंगनाथाला 'श्रीमंतांनीं अंतर महालांत जाऊन बसावें' असें सांगितलें. उद्देश हा कीं तेथें प्रकाश कमी असल्यामुळें तारुण्याचें सोंग साधतां येईल. शिवाय भुजंगनाथाला ऐकूं कमी येत होतें, त्यावरही पांघरूण घालण्याची युक्ति भद्रेश्वर दीक्षितानें सुचविली. "ते येऊन जाईतों आपण भागवताची पोथी पाहात बसा. त्यांनीं कांहीं विचारलं तर धोरणानें माझ्याकडे बोट करा. मला जी बतावणी करायची ती मी करतों." अशा युक्तीनें दीक्षितानें कांचनभटाला वाटेस लावलें. इतक्या युक्त्या-प्रयुक्त्यांचें प्रयोजन कांहींही नव्हतें; कारण कांचनभटाच्या नजरेंत पैशाशिवाय कशालाही स्थान नव्हतें. सुदामशेटला म्हातारा न समजणारा कांचनभट भुजंगनाथाला काय म्हणून म्हातारा म्हणणार होता? कांचनभट नवऱ्यामुलाला पसंत करून जातो, तोंच तेथें कोदंड आला.

**भुजंग :** या, बसा, कोदंड. आमच्या लग्नाचं ठरलं; कळलंच असेल तुम्हांला ?

कोदंड : हो, कळलं श्रीमंत. आणि त्याच संबंधानें एक विनंती करायची आहे.

भुजंग : समजलों काय विनंती करणार ती. मुहूर्त ठरवून लग्नसमारंभ एकदा लवकर उरकून घ्या, होच ना ?

कोदंड : ह्या विषयाचा आपण चांगला पोक्त विचार केला आहे का ?

भुजंग : अहो, हें लग्न तर एकदा उरकून टाका, मग सावकाश विचार करूं.

कोदंड : आधीं क्रिया नि मग विचार ? छे छे, आपण ही लग्नाची कल्पना सोडून द्या.

भुजंग : लग्नाची कल्पना सोडून द्या आणि धरा कसली ? काय चमत्कारिक आहां हो तुम्ही ? (इतक्यांत दीक्षित आणि सुवर्णशास्त्री येतात.) ऐकलंत का दीक्षित, अहो शास्त्रीबोवा, कोदंड सांगतात कीं लग्नाची कल्पना सोडून द्या. कशी आहे मसलत पुराणिकबोवांची ?

दीक्षित : पुराणिकबुवाच ते. त्यांना काय ह्या विषयाचं ज्ञान ? " भीष्मांनीं जे आहेत्ते दहा बाण सोडले, आणि द्रौपदी शोकाकुल होत्साती महा आक्रोश करती झाली बरं काय. त्या कालाचे ठायीं जे आहे त्ते !" हें ह्यांचं काम.

शास्त्री : ह्यांत काय संशय ? त्यांतून ह्यांची श्मश्रू नुकती कुठें दृश्यमान व्हायला लागली आहे. अनुभव तो दूरच आहे.

भुजंग : मी त्यांना असंच उत्तर देणार होतों, इतक्यांत तुम्ही आलां म्हणून थांबलों.

शास्त्री : कोदंड, शास्त्र प्रतिपादन करतं कीं प्रसंगोपात् असत्य भाषण करूनसुद्धा विवाह जुळवावा. आणि तुम्ही जुळलेल्यांत व्यत्यय आणतां ? योग्य, स्तुत्य उद्योग !

कोदंड : श्रीमंत, मी आपल्याला हिताची गोष्ट सांगतों. ती न ऐकाल तर जगाच्या उपहासाला पात्र व्हाल.



कोदंड : श्रीमंत, मी आपल्या हिताची गोष्ट सांगतों.
ती न ऐकाल तर जगाच्या उपहासाला पात्र व्हाल.

भुजंग : जगाशीं आम्हांला काय करायचं आहे ? आम्ही आमचे स्वतंत्र आहोंत. बस्स ! आम्ही लग्न करणार.

दीक्षित : छान, छान. श्रीमंतांनीं अगदीं समर्पक उत्तर दिलं. का शास्त्रीबोवा ?

शास्त्री : तें काय विचारावं ! श्रीमंतांचं उत्तर म्हणजे गदाच ती. प्रहाराबरोबर चूर्ण व्हायचं.

कोदंड : वा ! काय प्रशंसा चालली आहे ? श्रीमंत, मी पुन्हा एक वार सांगतों कीं ह्यांच्या प्रशंसेला भुलून माझ्या शब्दाचा अव्हेर करूं नका.

भुगंज : फार भय घालतां हो ? तर मग आम्ही लग्न करणारच.

कोदंडानें पाहिलें कीं ह्या तिघांनीं कोलाहल करायचेंच ठरवलें आहे. एखादा स्वार्थी किंवा लेचापेचा माणूस असता तर त्यानें त्या तिघांना तेथेंच सोडलें असतें. पण कोदंड पडला ध्येयवादी. त्यांतून त्यानें शारदेला संगमपूरच्या संगमनाथाच्या देवळांत 'ईश चिंता निवारील सारी' असा निर्वाळा दिला होता. शिवाय 'जरि करिन सकल खलकार्य विफल तरिच विप्रकुलिं जन्म सफल' अशी त्यानें आपल्या मित्राजवळ प्रतिज्ञा केली होती. कोदंड सरळ स्वभावाचा होता. भद्रेश्वर किती कपटी, पाताळयंत्री आणि उलट्या काळजाचा होता ह्याची त्याला नीटशी कल्पना नव्हती म्हणून त्यानें भुजंगनाथाला शारदेशीं लग्न करण्याच्या बेतापासून परावृत्त करण्याचा आपला प्रयत्न चालूच ठेवला. जरठकुमारी विवाहाचे जे दुष्परिणाम होतात ते ठळकपणें त्याच्या मनावर बिंबवण्याचा त्यानें प्रयत्न केला. पण त्याच्या प्रयत्नांना भद्रेश्वर व सुवर्णशास्त्री जोराचा विरोध करीत होते. भुजंगनाथही संगमपूरहून 'बायको घेऊन येतों' अशी प्रतिज्ञा करून निघाला

होता त्यामुळें तोही एक प्रकारें हट्टाला पेटला होता. त्याला युक्तिवाद पटणें शक्य नव्हतें आणि तो एकटा असता तर कदाचित् जो युक्तिवाद त्याला पटला असता तो भद्रेश्वर आणि सुवर्णशास्त्री ह्यांच्या हजिरींत पटणें शक्य नव्हतें. त्यांच्या चिथावणीमुळें भुजंगानें कोदंडाला सांगितलें कीं जोंपर्यंत आम्ही आहोंत तोंपर्यंत आम्हांला बायको ही पाहिजेच. सुवर्णशास्त्र्याला हेंच पाहिजे होतें.

**शास्त्री** : अहाहा ! श्रीमंतांनीं अगदीं उत्तम रामबाण निर्णय केला. 'शुनः कपाले लगुडप्रहारः' ह्याच न्यायाचा ह्या कलिकालांत अवलंब केला पाहिजे. का कोदंड, मुख म्लान झालं ? शंकासमाधान होऊन प्रत्यय आला वाटतं ?

**कोदंड** : आला, पण तो कशाविषयीं ? तर वीतभर पोटाकरतां तुम्ही उभयतां कोणतंही निंद्य कर्म करायला चुकणार नाहीं, ह्याचा आला. आतां मी जर तुम्हांला श्वानवृत्तीचे म्हणेन, तर त्यांतही तुमचा गौरवच केल्यासारखा होईल. कारण त्याच्या ठिकाणीं प्रामाणिकपणा हा मोठा गुण असतो. तुम्ही श्वानाहून नीच आहां.

**दीक्षित** : कोदंडा, मर्यादा सोडून चाललास. शुद्धीवर ये; कुणाला काय बोलतोस ? कृतघ्ना, विपत्कालीं तुला आश्रय दिला, त्याचे हे उपकार फेडतोस ?

**कोदंड** : तो आश्रय परोपकारबुद्धीनें दिला नाहींस. तूं रचलेल्या कपटनाटकांत माझा उपयोग होता, म्हणून दिलास.

**भुजंग** : हा विषारी साप आमच्यावर उलटल्यासारखा दिसतो. ह्याचे दांत पाडले पाहिजेत, नाहींतर हा दंश करील; हो, दंश करील !

**कोदंड** : अरे जा, श्रीमंतीचं सोंग घेणाऱ्या थेरड्या, ढोंग्या भुजंगनाथा, आतां एका क्षणांत तुझी श्रीमंती झाडून टाकतों पाहा.

**भुजंग** : हा पाहा, दीक्षित, हा पाहा काय म्हणतो तें ! ह्याला कांहीं तरी द्रव्याची लालूच दाखवा.

**दीक्षित :** अहो कोदंड, झालं तें गेलं, आतां बोलूं नका. हवं तर श्रीमंतांच्या लग्नाबरोबरच तुमचं लग्न करून टाकतों. हवीतर नवरत्नांची एक सुरेखशी कंठी गळ्यांत घालतों. बोला, कोणतं पसंत पडतं ?

**कोदंड :** चल, भाषण करूं नकोस. तुला स्वत:सारखेच सर्व दिसतात. माझं ऐकायचं असेल तर लग्नाचा नाद सोडून, ह्या नंदीबैलाला घेऊन, आतांच्या आतां ह्या क्षेत्रांतून चालता हो. असं न करशील तर तुझ्या कारस्थानाचा एका घटकेंत सर्व क्षेत्रभर डंका वाजला म्हणून समज.

**दीक्षित :** कोदंडा, तुझ्यासारख्या कच्च्या पोराच्या दटावणीला मी भीक घालतों होय ? तूंच हें क्षेत्र सोडून ह्या क्षणीं चालता हो, नाहीं; तेंही नाहीं चालणार. कोदंडा, सर्पाला दुखवून जिवंत सोडीन इतका मी भोळा नाहीं. ह्या हेरंब महालाच्या गारशा तळघराचं तर थोडं सुख घ्या. गोरख, कानीफ, चला. ह्या चोराला चतुर्भुज करून तळघरांत नेऊन टाका.

गोरख व कानीफ कोदंडाला खेचून घेऊन गेले. अशा तऱ्हेनें त्याला कोंडून ठेवणें हा गुन्हा होता. तेव्हां त्याच्यावर सारवण घालणें अवश्य होतें. भद्रेश्वरानें गंगापूरच्या अधिकाऱ्यांशीं वळण बांधलेलें होतेंच. त्यांना भेटून ह्या प्रकरणाचा बोभाटा होणार नाहीं आणि अधिकारी कोदंडास सोडवायचा प्रयत्न करणार नाहींत असा बंदोबस्त भद्रेश्वरास करणें भाग होतें. ही गोष्ट सुवर्णप्रयोगाशिवाय साधणें शक्य नव्हतें. त्या कामाला लागणारा पैसा खर्च करायची परवानगी त्यांनीं भुजंगनाथाजवळ मागितली आणि त्यानें ती ताबडतोब दिली. ते दोघेही अधिकाऱ्यांची मूठ दाबावयास गेले आणि भुजंगनाथानें भद्रेश्वराच्या प्रसंगावधानाची तारीफ केली.

म. श्री.



# अवघे पाऊणशें वयमान

सुवर्णशाळ्याची मुलगी वल्लरी ही शारदेची मैत्रीण होती. कांचनभटानें आपली मुलगी शारदा म्हाताऱ्या भुजंगनाथाला द्यावयाचें कबूल केलें हें तिला बापाकडून समजलें. वल्लरीच्या बरोबर ज्या दुसऱ्या मैत्रिणी गंगापूरहून संगमपूरला गेल्या होत्या त्यांनीं एक हळदीकुंकू करावयाचें अंगावर घेतलें आणि त्याप्रमाणें कसून मेहनत करून त्यांनीं सुंदरशी गौरीची सजावट केली. शारदेशिवाय त्या जागीं सर्व मैत्रिणी जमल्या होत्या. त्यांपैकीं त्रिवेणी नांवाच्या मुलीनें शारदेच्या गैरहजेरीबद्दल नापसंती उघड बोलून दाखवली. आपल्याला मिळालेली बातमी आपल्या मैत्रिणींना द्यावयास ही संधि अनुकूल आहे असें पाहून वल्लरीनें ‘ आज शारदेची एक गम्मत मला समजली आहे ’ अशी मोघम सुरुवात केली. इतक्यांत शारदा आली. वल्लरीनें उपरोधिक शब्दांत तिच्या श्रीमंतीचें आणि वैभवाचें चित्र उभें करावयास सुरुवात केली. आपण काम चुकवण्याकरतां उशिरां आलों म्हणून ह्या मैत्रिणी रागावल्या असें शारदेला वाटलें.

शारदा : काय मेला एवढासा उशीर झाला यायला, तर इतकी थट्टा करतेस! येऊन जाऊन काय तो कामाचाच डौल ना ? तूं बैस कशी आतां स्वस्थ. मी तुझ्याही वांटणीचं काम करतें आणि माझ्याही वांटणीचं करतें.

वल्लरी : भलतंच कांहींतरी ! बाईसाहेबांनीं काम करून आम्हीं स्वस्थ बसायचं ! नको ग बाई.

मंदा : वल्लरी, पुरे मेली इतकी थट्टा. मला एक शारदेची गम्मत समजली आहे असं मघाशीं म्हणत होतीस, ती काय गम्मत ग ?

मुली : खरंच वल्लरी, काय गम्मत ग ती ? सांग सांग पाहूं लवकर.

वल्लरी : अशी घाई नका करूं गडे. गम्मत म्हणजे गंमतीगमंतीनेंच सांगितली पाहिजे. शारदा आज शेलारी नेसली आहे. ती पाहिलीत का ? कुणी दिलीन् तें ओळखा बरं.

जान्हवी : हा मेल्यांनो, हें कसं ओळखायचं ? शारदे, तूंच सांगेनास ?

शारदा : वल्लरीचा चावटपणा एकदा संपूं द्या, मग सांगेन मी.

वल्लरी : श्रीमंतांनीं तुला शेलारी दिली, त्यांत मीं ग काय चावटपणा केला ?

तुंगा : शारदे, श्रीमंत ग कोण ?

शारदा : मला कांहीं ऐकायलाच येत नाहीं.

वल्लरी : नाहींच यायचं ! पण तिला कशाला विचारतां ? मी सांगतें. ते, हेरंब महालांत येऊन राहिले आहेत ते —

मंदा : त्यांनीं काय म्हणून हिला शेलारी दिली ?

वल्लरी : उगीच कोण कुणाला देईल ? अग, ही शारदा येत्या वैशाखांत त्या श्रीमंतांची अर्धांगी होणार ! आतां तरी पडला का उजेड ! मुहूर्तसुद्धा ठरला. माझे बाबा सांगत होते.

तुंगा : सुवर्णशास्त्री ना ? मग खरंच तर.

शारदा : मंदाकिनी, मला कांहीं काम सांगतसे, का मी आपली हळदीकुंकूं घेऊन जाऊं घराकडे ?

मंदा : आतां नका ग कुणी तिची थट्टा करूं. बिचारी किती दिवस नवऱ्यासाठीं नवस करीत होती; पण शेवटीं देवानें गाऱ्हाणं ऐकलं हो. शारदे, असं स्थळ हजारों रुपये हुंडा भरून, मोठमोठ्यांच्या मुलींनासुद्धा मिळायचं नाहीं.

त्रिवेणी : बरं पण, वल्लरी, श्रीमंतांचं वय किती आहे ?

वल्लरी : वयाची गोष्ट काढूं नकोस.

मुली : म्हणजे ? म्हातारा आहे कीं काय ?

वल्लरी : छे छे !

म्हातारा इतुका न । अवघें पाउणशें वयमान । लग्ना अजुनि लहान ॥ ध्रु० ॥ दंताजीचें ठाणें उठलें, फुटले दोन्ही कान । डोळे रुसले कांहिं न बघती । नन्ना म्हणते मान ॥ १ ॥ तुरळक कोठें केश रुपेरी, डोइस टक्कल छान । भार वयाचा वाहुनी वाहुनी कंबर होय कमान ॥ २ ॥ काठीवांचुन नेट न पायां परि मोठें अवसान । उसनी घेउनि ऐट चालतां काय दिसे तें ध्यान ॥ ३ ॥

जान्हवी : शारदे, ऐकलंस का पतिराजांचं वर्णन ? अशी खालीं कां मान घातलीस ? लाजलीस वाटतं ?

वल्लरी : तुमचं ठीक आहे ग. दुसऱ्याचा इकडे प्राण जात असला तरी तुमची आपली थट्टा चालायची !

मंदा : पण कांचनभट कितीही कवडीचुंबक असला तरी तसल्या म्हाताऱ्या खोडाच्या गळ्यांत आपला पोटचा गोळा टाकील, हें मला अजून खरं वाटत नाहीं.

शरयू : आणि शारदेला तरी कुठें खरं वाटत होतं ? कायसं म्हणतात ना ? ' दाखिवलं सोनं, हसे मूल तान्हं. ' मग हा तर कांचनभट.

त्रिवेणी : शारदे, हें ग काय ? अशी रडूं नकोस बाई. आईबापांनीं बुडवलं आणि नवऱ्यानं तुडवलं, सांगायचं कुणाला ? अशीच आईकडे जा, आणि तिच्याकडून बघ कांहीं झालं तर. पण बाहेर हांका कोण मारीत आहे ?

**गाडीवान :** ( पुढें येऊन ) शारदाबाई, कांचनभट तुमासनी दाखवायला शिरिमंतांकडे घेऊन जानार हैत, म्हून म्यां गाडी आनलीया. त्ये आतां इक्त्यात येत्याल. तुमी गाडीमंदी येऊनशानी बसा.

**शारदा :** बरं, आलें, चल. मंदाकिनी, येतें बरं का.

शारदेला पाहावयास भुजंगनाथ अगदीं उतावीळ होऊन बसला होता. व्यवस्थित सजून शक्य तितका तरुण दिसण्याचा त्यानें कसून प्रयत्न केला होता. त्यांत दीक्षिताच्या सल्ल्यावरून ही भेट कमी प्रकाशाच्या खोलींत घडेल अशीही त्यानें योजना केली होती. भुजंगनाथाला शारदेची एकटीची गांठ घ्यायची इच्छा होती. ही इच्छा अयोग्य होती आणि कांचनभटासारख्या लोभी माणसाशिवाय दुसरा कोणीही वधुपिता असता तर ही इच्छा पुरी होऊं शकली नसती. हें श्रीमंत जांवयाचें स्थळ कोणत्याही कारणानें हातचें जाऊं द्यावयाचें नाहीं असा कांचनभटाचा निर्धार होता. त्याचा फायदा घेऊन भद्रेश्वरानें युक्तीनें ही गोष्ट साधली. 'तुमची मुलगी भित्री आहे असा कोणीं श्रीमंतांचा ग्रह करून ठेवला आहे' असें त्यानें कांचनभटाला सांगितलें.

**कांचन :** माझी शारदा भित्री ! हें पाहा दीक्षित, नसती खोड काढून व्यापार मोडणं, नव्हे लग्न मोडणं, हें श्रीमंतीलाही शोभत नाहीं आणि संभावितपणालाही उचित नाहीं. शारदेला भित्री कोण म्हणतो ? आणा त्याला असा.

**दीक्षित :** अहो, विघ्नसंतोषी लोकांना उद्योग काय दुसरा ? तुम्हांला त्यांच्याशीं काय कर्तव्य ? प्रत्यक्ष मीं तुमची मुलगी पाहिली आहे ना ? पण श्रीमंतांच्या मनांत भरलेला संशय तर तसाच ठेवून सोय नाहीं ! त्यांचं म्हणणं, श्रीमंतांच्या बायकांत भित्रेपणा असणं हा मोठ्यांतला मोठा दुर्गुण.

कांचन : आणि तुमच्या आमच्या बायकांत त्याला गुण का म्हणतात ? तें कांहीं नाहीं. मीच आतां श्रीमंतांना सांगतों कीं स्त्री करायची म्हणजे जन्माची जोड पाहायची. ती प्रथमतःच नीट कसोशीनें पारखून केलेली चांगली.

दीक्षित : झालं, आणखी काय ? आणि मी तरी रीतीविरुद्ध मुलीला इकडे दाखवायला घेऊन या, म्हणून तुम्हांला सांगितलं तें ह्याचकरतां. प्रथम काय तें होऊं द्या. जा, मुलीला हांक मारा. तिला आंत नेऊन त्यांच्यासमोर बसवूं आणि आपण बाहेर निघून जाऊं. श्रीमंतांच्या प्रश्नांना उत्तरं द्यायला तुमची मुलगी खंबीर आहे.

कांचन : आहे म्हणजे आहेच. जातों तर, तिला घेऊन येतों. ( जातो. )

कांचनभट मुलीला घेऊन भुजंगनाथ बसला होता तेथें आला. दीक्षितही त्याच्याबरोबर होता. ठरवल्याप्रमाणें दीक्षित कांचनभटाला घेऊन बाहेर गेला. शारदेनें ‘ तुम्ही चाललांत कुठें ? मी इथें एकटी कशी राहूं ? ’ असा प्रश्न विचारला, त्याला ‘ हाच हाच तो भित्रेपणा. पुन्हा असं बोलूं नकोस. मी हा आलोंच. काय नांव गांव विचारतील, तें न भितां सांग म्हणजे झालं. ते कांहीं खात नाहींत तुला. ’ असा जबाब कांचनभटानें दिला. ते दोघे निघून गेल्यावर भुजंगनाथ शारदेच्या जवळ आला त्या वेळीं त्याच्या कपाळावर आठ्यांचें जाळें होतें तें शारदेला दिसलें. त्यानें नांव विचारलें तेव्हां आपलें नांव ‘ शारदा ’ आहे असें तिनें सांगितलें. त्याला ऐकूं आलें ‘ सारजा. ’ त्यावरून त्याला नीटसें ऐकूं येत नाहीं हेंही तिला समजलें. नंतर तिला दागिने कसले हवेत असें विचारण्याच्या निमित्तानें तो तिच्या पाठीवर हात ठेवूं लागला, त्याबरोबर ‘ असं पुन्हा कराल तर मी मोठ्यानें ओरडून बाबांना हांक मारीन ’ असें ठणठणीतपणें तिनें बजावलें. तरीही तो तिला सोडीना, तेव्हां तिनें धमकी घातली, ‘ मला अशी अडवाल तर मी तुमच्या पायांशीं

कपाळ फोडून घेईन.' भुजंगनाथ घाबरला आणि आपली चूक कबूल करून पुन्हा असें न करण्याचें त्यानें आश्वासन दिलें. आपल्या म्हणण्याची खात्री पटावी म्हणून त्यानें आपल्या थोबाडांत मारून घेतली त्या वेळीं त्याची दांतांची कवळी तोंडांतून बाहेर आली. शारदेच्या हें लक्षांत आलेलें पाहातांच भुजंगनाथ तिला आर्जवानें म्हणाला, 'ही गोष्ट कुणापाशीं बोलूं नकोस.' शारदेनें तें कबूल केलें, पण एका अटीवर, कीं भुजंगनाथानें शारदेशीं लग्न करण्याचा विचार सोडून द्यावा. कारण विचारतां,

शारदा : वाटुं न द्यावा विषाद चित्ता । सत्य दिसे तें वदतें आतां ॥
वयें अजोबा माझे दिसतां । नात दिसें मीहि ॥ १ ॥

भुजंग : काय? मी वयानें आजोबा दिसतों का? म्हणजे अर्थात तूं आम्हांला म्हातारा ठरवलंस? आमच्याशीं असं उद्धटपणानं बोलायला तुम्हीच शिकवलंत का, असं जाऊन तुझ्या बापाला विचारतों.

शारदा : मला खरं वाटलं तें मी बोललें.

भुजंग : काय? मी म्हातारा हें तुला खरं वाटलं? तुम्हांला असंच वाटतं का, म्हणून कांचनभटाला विचारतों. (रागानें जातो.)

शारदा : देवा, हें काय झालं? करायला गेलें एक आणि झालं भलतंच. आतां बाबा संतापून माझी काय दशा करतील कोण जाणे!

कांचन : (घाईनें येऊन) अग कारटे, काय बोललीस त्यांना? नीट उत्तर दे असं मीं सांगितलं म्हणून तूं माझी खोड मोडलीस वाटतं? चल आतां घराकडे.

कांचनभटानें मारीत ओढीत शारदेला घरीं नेलें.

शारदा आपल्या घरीं गेली त्या वेळीं तिची आई इंदिराबाई तिची वाटच पाहात होती. ती आपल्या आईच्या गळ्यांत पडून रडूं

लागली. इंदिराबाईला वस्तुस्थितीची कल्पना नव्हती त्यामुळें शारदेच्या रडण्याचा तिला उमज पडेना. पुन्हा पुन्हा शारदेला तिच्या आईनें विचारलें, तेव्हां शारदेनें उत्तर दिलें:

**यमपाश गळयाशीं ज्यास लागला, त्यास मला कां देतां ॥**
**कां मांस विकुनी, धर्मास वांकडे जातां ॥**
**पाळिलें घातलें खाया अजवरी। बकरीस मोल बहु याया ज्यापरी**
**ही तुमचि मुलीवर माया कां खरी ॥**
**जगतांत सदय सकळांत माउली तात, मुलीला असतां ॥**
**मग तुम्हीच इतके कठोर कां गे होतां ॥ १ ॥**

ह्याच वेळीं शारदेच्या मैत्रिणी वल्लरी व जान्हवी येतात. त्यांना अशा तिन्हीसांजा आलेल्या पाहून इंदिराबाईला आश्चर्य वाटलें. शारदेचें लग्न म्हाताऱ्याशीं होऊं नये असें तिच्या सगळ्या मैत्रिणींना वाटत होतें. संगमपूरलासुद्धा त्यांनीं हीच इच्छा बोलून दाखवली होती पण लहान मुली त्या, वडीलधाऱ्या माणसांच्या परवानगीवांचून त्या काय करणार! त्यांपैकीं वल्लरी जरा धीट होती. पुष्कळ विचार करून तिनें निश्चय केला आणि हळदीकुंकूं आटपल्यावर ती इंदिराबाईला भुजंगाच्या वयाची माहिती द्यावयास जान्हवीला बरोबर घेऊन आली. ह्या वेळपर्यंत इंदिराबाईला नवऱ्यानें दिलेल्या माहितीपलीकडे कांहींही ठाऊक नव्हतें. त्यानें तर भुजंगनाथ देखणा, शहाणा आणि तरणा आहे असें तिला सांगितलें होतें. वल्लरीनें सरळच सांगितलें, "तुम्हांला जर मुलीचं खरंखुरं सुख पाहायचं असेल तर ठरवलं आहे तिथें शारदेला देऊं नका आणि नुसत्या भपक्यावरच जायचं असेल तर आमचं कांहीं म्हणणं नाहीं."

इंदिराबाईला आश्चर्य वाटलें. नवऱ्यानें आपल्याशीं इतकें कपट केलें असेल ह्याची तिला कल्पना नव्हती. तिला कांहींच माहीत नव्हतें हें शारदेला प्रथम पटेना पण वल्लरीनेंच 'त्यांना माहीत नव्हतं हें मीसुद्धा सांगतें' असें सांगितल्यावर तिला तें पटलें. इतक्यांत कांचनभट घरीं परत आला. वल्लरी व जान्हवी त्याच्या दृष्टीस पडणें इष्ट नव्हतें म्हणून त्यांना मागील दारानें जावयास सांगून युद्धाच्या तयारीनें इंदिराबाई उभी राहिली.

**इंदिरा :** शारदे, आतां अगदीं भिऊं नकोस. मला कांहीं तूं अधिक झाली नाहींस. तुझा जीव काय आणि माझा जीव काय एकच, समजलीस? रडूं नकोस आतां.

**शारदा :** म्हणून तर आई मी येऊन तुझ्या गळीं पडलें. पण ती बेगडी श्रीमंती पाहून बाबांच्या तोंडाला पाणी सुटलं आहे, आणि त्यांनीं मला खाईंत टाकायचं मनांत आणलं आहे, त्याला काय करशील? माझे बाबा असे उलट्या काळजाचे नाहींत म्हणून मी ह्या मुलींबरोबर किती भांडत होतें!

**कांचन :** (पाय आपटीत येऊन) काय ग कारटे? मी उलट्या काळजाचा आणि मी तुला खाईंत टाकणार आहें का? फार फारशी जीभ लांब केलीस? इतकी मस्त झाली आहेस का! चल चालती हो. आत्तां नीघ माझ्या घरांतून. (शारदेला मारतो.)

**इंदिरा :** हें काय? उगीच काय म्हणून पोरीला मारायचं? शारदे, जा स्वयंपाकघरांत, आत्याबाईजवळ जाऊन बस.

**शारदा :** जन्म देणारेच मारायला लागल्यावर जायचं कुठें! (जाते.)

**कांचन :** पुन्हा तोंड, पुन्हा तोंड करते! मस्तवाल कारटी! म्हणे तें स्थळ असंच आहे, म्हणे ती बेगडीच श्रीमंती आहे, तिथें म्हणे मला कां देतां? जसं कांहीं कारटीचं स्वयंवरच चाललं आहे! गळ्यांत दावं बांधून विकीन तिथें तुला गेलंच पाहिजे.

इंदिरा : दावं बांधून विकायला माझी मुलगी म्हणजे गोठ्यांतली पारडीच की नव्हे ? पैशाकरतां आपली मुलगी म्हाताऱ्याला विकायची हें माणसांना शोभतं का ?

कांचन : कां विकूं नये ? पूर्वीं कुणीं विकली नाहीं, कीं पुढें कुणी विकणार नाहीं ? आणि तिला विकल्याशिवाय आज चौदा वर्षं तिच्या पालनपोषणाकरतां झालेला खर्च कसा भरून येणार ?

इंदिरा : नको ग बाई, हे शब्द ऐकायलासुद्धा नकोत. इतकीं कशीं पुरुषांचीं मनं निर्दय म्हणतें मी ! तें कांहीं नाहीं, तिला आणि जयंताला घेऊन मी आपली माहेरीं जातें कशी ?

कांचन : ठीक आहे. उत्तम ! उत्तम ! जयंताला घेऊन खुशाल जा. मी सुपारी लावून लग्न लावीन पोरीचं.

इंदिरा : आणि तिच्यावर नाहीं का माझी सत्ता ?

कांचन : सत्ता असेल, पण मत्ता आहे माझी. म्हणे मी माहेरीं जातें. भंय घालते मला. आण इकडे माझी संध्येची कळशी. असल्या कामांत असली तापट बायको मुळींच उपयोगी नाहीं. ( जातो. )

शारदा : आई, मीं सगळं बोलणं ऐकलं. आतां मला तारणार तूंच आणि मारणार तूंच.

इंदिरा : माझं मन तर बाई पेटल्यासारखं झालं आहे. काय करूं ?

शारदा : मला ह्या जगांत आणलीस, तशीच परत पोचीव म्हणजे झालं.

इंदिरा : म्हणजे ?

शारदा : तूं टाक चिरुनि ही मान नको अनमान ॥
नउ मास वाहिलें उदरिं तयाचा कांहिं धरीं अभिमान ॥ ध्रु० ॥
तो कसाब झाला तात । करूं सजे मुलीचा घात ।
मग बरा तुझा मउ हात । जा विसरुनि माया सारि
करीं घे सुरी, धरीं अवसान ॥ १ ॥ हें कठिण दिसे जरि
काज । विष तरी जरासें पाज । परि ठेवूं नको जगीं आज ।
जी मुलीचें दुःख निवारिना ती माय नव्हे दुस्मान ॥ २ ॥
इंदिरा : आंत चल, वन्संना तरी कांहीं सुचतं का विचारून पाहातें.

येथपर्यंत सर्व कांहीं भद्रेश्वराच्या मनासारखें होत होतें. पण त्यानें कोदंडाला अन्नपाण्यावांचून तळघरांत कोंडून ठेवलें ह्याचा परिणाम हेरंब महालांतील पहारेकरी गोरख ह्याच्यावर अगदीं प्रतिकुल झाला. कसेंही करून कोदंडाची सुटका झालीच पाहिजे असें हिरण्यगर्भाला वाटत होतें. भद्रेश्वराचीं सर्व नीचपणाचीं कृत्यें त्यानें गोरखाला समजावून सांगितलीं आणि कोदंडासारखा सच्छील ब्राह्मण अन्नपाण्यावांचून मरेल हेंही त्याला हिरण्यगर्भानें पटवून दिलें. गोरखानेंच भद्रेश्वराच्या हुकमावरून कोदंडाला तळघरांत डांबून ठेवावयास कानीफला मदत केली होती त्यामुळें आतां त्याला पश्चात्ताप झाला आणि हिरण्यगर्भाला त्यानें कोदंडाच्या मुक्ततेच्या कामीं साहाय्य करायचें कबूल केलें. भुजंगनाथाची शारदेशीं एकान्तांत गांठ घालून देण्याच्या कारस्थानांत भद्रेश्वर पूर्णपणें गढून गेला आहे असें पाहून त्या संधीचा हिरण्यगर्भानें फायदा घेतला आणि गोरखाच्या साहाय्यानें कोदंडाची मुक्तता केली. अन्नपाण्यावांचून राहावें लागल्यामुळें जरी कोदंड क्षीण झाला होता तरी त्यानें पहिला प्रश्न केला, 'भुजंगनाथाच्या लग्नाचं कुठपर्यंत आलं? झालं तर नाहीं ना?' वैशाख शुद्ध द्वादशीचा मुहूर्त ठरला आहे असा जबाब हिरण्यगर्भानें दिला त्या वेळीं कोदंडानें समाधानाचा सुस्कारा सोडला. आपल्याला कार्य करायला पुष्कळ वेळ आहे, मात्र तूं कांहीं दिवस भद्रेश्वराजवळ राहा, असें कोदंडानें हिरण्यगर्भाला सांगितलें. गोरखानें भद्रेश्वरासारख्या नीच माणसाची नोकरी सोडायचा निर्धार केला आणि कोदंडाबरोबर त्याचा रक्षक म्हणून राहायची प्रतिज्ञा केली. हिरण्यगर्भ तेथेंच राहिला. कोदंड गोरखासह निघून गेला.

♣



# लग्न होय कीं कुंवार अजुनी

चैत्र संपला. वैशाख उगवला. लग्नाचे मुहूर्त सुरू झाले. कोदंडाला हेरंब महालाच्या तळघरांत कोंडून ठेवल्यापासून भुजंगनाथाचें लग्न शक्य तितक्या लवकर उरकून घेणें भद्रेश्वरास भाग होतें. पण चैत्रांत लग्न करणें शक्य नव्हतें. कोदंड तळघरांतून पसार झाला हें कळल्यावर तर भद्रेश्वराला फारच घाई झाली. पण वैशाख महिन्यांतील द्वादशीचा मुहूर्त त्यानें ठरवला होता तो बदलून अगोदरचा मुहूर्त घेणें शक्य नव्हतें. भद्रेश्वर, भुजंगनाथ आणि कांचनभट त्या दिवसासाठीं उतावीळ झाले होते. तो दिवस लांबेल तितका बरा असें एका शारदेला वाटत होतें. पण दिवस हा यावयाचा तेव्हांच येतो. शेवटीं तो दिवस येऊन ठेपला.

लग्नमुहूर्ताच्या आदल्या दिवशीं शारदेनें बापाला आपल्या मनांत काय होतें तें अगदीं तिखट, झोंबणाऱ्या शब्दांत सांगितलें. पण कांचनभटाच्या निगरगट्ट अंतःकरणावर त्याचा कांहीं परिणाम

झाला नाहीं. तो होणार नाहीं हें शारदा जाणून होती, पण शेवटचा प्रयत्न म्हणून तिनें तसें केलें.

शारदा : बाबा, तुमचं दारिद्य दूर करण्याकरतां देवानें मला तुमच्या पोटीं घातलीन् हें इतके दिवस माझ्या ध्यानांतच आलं नाहीं. तुम्हींच जतन करून वाढवलेली तुमची मुलगी तुम्हीच विकणार, त्यांत वाईट तें काय? पण मेली माझी पोरबुद्धि, म्हणून मेला उमज पडला नव्हता. आतां माझं कांहीं एक म्हणणं नाहीं. एक मात्र करा.

मागिल जन्मींचें, अतांचें मी ऋण देणें असेल तितकें
फेडुन घ्या तुमचें ॥ १ ॥ तुमचें मजवरचें, असे तें
प्रेम धनाचें, नव्हे मनाचें, कळलें मज पुरतें ॥ २ ॥
पुढच्या जन्मिं तरी, शिरावरि, भार न ठेवा, हे मानिन
मी उपकारचि भारी ॥ ३ ॥

कांचनभट तेथून गेला. इतक्यांत शारदेचा मामा संतापानें पाय आपटीत आपटीत तेथें आला. शारदेचें लग्न म्हाताऱ्याशीं ठरवलेलें ऐकल्यापासून तो चिडला होता आणि तें लग्न मोडण्यासाठीं तो आला होता. भुजंगनाथाकडून जी रक्कम कांचनभटाला मिळावयाची होती तेवढी रक्कम तो द्यावयास तयार होता. शिवाय शारदेचें लग्न योग्य वराशीं लावून देण्याची व त्यासाठीं लागणारा सर्व खर्च करावयाची त्यानें तयारी दर्शवली. कांचनभट ऐकेना म्हणून तो खुद्द शारदेचें मन वळवावयास आला. पण शारदा त्याच्या सांगण्यावरून बापाच्या इच्छेविरुद्ध जायला तयार नव्हती. जुन्या संस्कृतीचा जो तिच्या मनावर परिणाम झालेला होता त्याला धरूनच हें तिचें वागणें होतें. आपण इतक्या कळकळीनें आलों, इतकी यातायात केली, एवढी मोठी जबाबदारी घेतली तरी शारदेनें त्याचें चीज केलें नाहीं म्हणून तो चिडला. 'माझे बाबा मला विकोत, विहिरींत

लोटोत, अन्नावांचून मारोत, कीं पुरून ठेवोत, मी त्यांच्याविरुद्ध त्यांच्या घरांतून कुठें जाणार नाहीं' असें जेव्हां शारदेनें स्पष्टपणें सांगितलें, त्या वेळीं तिचा मामा 'जा, तूं तरी त्याचीच पोरगी कीं नाहीं? मीच इथें राहात नाहीं. मग मागें कांहीं का होईना?' असें तणतणला आणि निघून गेला.

दीक्षिताला गंगापूरचें वातावरण प्रतिकूल होऊं लागलें. त्यानें लांच देऊन वश केलेले दोघेही अधिकारी स्थानभ्रष्ट झाले आणि त्यांच्या जागीं आलेल्यांच्यावर सुवर्णमंत्र टाकावयास अवधि नव्हता. तशांत त्याचा आणि सुवर्णशास्त्र्याचा मतभेद झाला, त्यामुळें त्याचेंही सहकार्य मिळेनासें झालें. हें पाहून भद्रेश्वरानें एक बेत ठरवला. सरळ आणि वाकड्या अशा दोनही मार्गांचा अवलंब करून भद्रेश्वरानें बरेंचसें सोनेंनाणें अदृश्य केलें होतें. तें आपल्या पत्नीपाशीं पोचावें अशी त्याची तीव्र इच्छा होती. तेवढें आपल्या घरीं पोचलें म्हणजे मग कमीजास्त प्रसंगाला तोंड द्यावयास तो मोकळा झाला असता. त्याला शामसुंदर म्हणजेच हिरण्यगर्भ, अशी शंका आलेली नव्हती, म्हणून तें जडजवाहीर त्याच्याजवळ देऊन तें आपल्या पत्नीच्या स्वाधीन करण्याच्या कार्यावर त्यानें शामसुंदरची नेमणूक केली.

अखेरीस मुहूर्ताचा दिवस आला. बोहल्यावर वधू-वर उभीं राहिलीं. त्यांच्यामध्यें अंतरपाट धरून भटजी मंगलाष्टकें म्हणूं लागले. इतक्यांत गर्दींतून वाट काढीत कोदंड तेथें आला.

कोदंड : अहो, ह्या अशा क्षेत्रांत, त्यांतून ब्राह्मणांत, काय अधर्म हा?

ब्राह्मण सारे जमलां । कैसा सोडुनि मग शास्त्राला ।
द्विजविवाह हा चालला ॥ १ ॥ जनका धर्म न दिसला ।

कांचनतेजानें तो दिपला । कां धना तुम्हीहि भाळला
॥ २ ॥ काश्यप गोत्रीयाला करितां तद्गोत्रज ही बाला ।
कां अंध असे जाहलां ॥ ३ ॥

उपाध्याय : काय, काय ? श्रीमंतांचेंही काश्यप गोत्र ! विष्णवे नमः । विष्णवे नमः । काय हो, कांचनभटजी, काय म्हणतात हे ?

कांचन : ते अगदीं असत्य बोलतात. प्रत्यक्ष दीक्षितांनीं श्रीमंतांचं गोत्र कौशिक म्हणून मला सांगितलं आहे.

कोदंड : काय हो, श्रीमंत, तुमचं गोत्र काय बोला.

भुजंग : आमचं गोत्र काश्यप.

हें ऐकल्यावर अंतरपाट टाकून सर्व ब्राह्मण तेथून निघून गेले. 'आतां आमचं लग्न होत नाहीं' असा दीनवाणा उद्गार भुजंगनाथानें काढला.

भद्रेश्वरानें कोदंडाला तळघरांत कोंडून ठेवलें होतें, ह्याबद्दल कोदंडानें कोतवालींत फिर्याद नोंदवली आणि भद्रेश्वरास पकडण्याकरितां एक दोन शिपाई बरोबर घेऊन कोतवाल लग्नमंडपापाशीं आला. तितक्यांत हिरण्यगर्भ, म्हणजेच शामसुंदर, भद्रेश्वरानें त्याच्या स्वाधीन केलेली जवाहिरानें भरलेली पेटी घेऊन तेथें आला. ती पेटी उघडतां आंतील जडजवाहीर बरेंच होतें असें आढळून आलें. भद्रेश्वरास कोतवालानें विचारलें कीं इतकें जडजवाहीर त्याच्याजवळ कसें आलें ? तेव्हां त्यानें उत्तर दिलें कीं भुजंगनाथानें दिलेली ही मध्यस्थीची बिदागी आहे. कोतवालानें भुजंगनाथाला 'हें जडजवाहीर तुम्हीं ह्या दीक्षिताला बक्षीस दिलं होतंत का ?' असें विचारलें.

भुजंग : मी ! हें इतकं जवाहीर !! आणि ह्याला बक्षीस !!! स्वप्नांत सुद्धा नाहीं हो; हें ह्यानें खास चोरलेलं आहे. ह्याला चांगली शिक्षा ठोठावा.



कोदंड : ब्राह्मण सारे जमलां । कैसा सोडुनि मग शाळाला । द्विजविवाह हा चालला ॥

**कोतवाल :** गप्प बैस थेरड्या. तुम्ही दोघेही सारखेच नीच आहां.

इतक्यांत भुजंगनाथाचा पुतण्या त्या ठिकाणीं आला.

**भुजंग :** कोण, माझा पुतण्या भैरवनाथ ! माझा वैरी इथें आला. झालं, भरलं आमचं आयुष्य. तो पाहा, तो पाहा, आलाच.

**भैरव :** काकासाहेब, वाः ! इकडे शंभर कोसांवर येऊन, श्रीमंतीचं सोंग घेऊन, नांव गांव बदलून, गोत्र चोरून, चतुर्भुज व्हायची तुमची स्वतःचीच का क्लृप्ति ?

**भुजंग :** नव्हे; ह्या ह्या भ–भ–भ–वा–भा–भ–भ–

**कोतवाल :** अरे ह्याला अर्धांगाचा झटका आलेला दिसतो. जा रे जा, वैद्याला बोलावून आणा. अहो कोदंड, आम्ही ह्या दीक्षिताला घेऊन, हेरंब महालाला जप्तीची मोहोर करून चावडीकडे जातों. वैद्य येईपर्यंत तुम्ही इथेंच राहा. गोरख, त्या सुवर्णशास्त्र्याला असेल तसा चावडीवर घेऊन ये. भैरवनाथ, तुम्ही चला आमच्याबरोबर.

**कांचन :** अहो कोतवालसाहेब, हे श्रीमंत असे पडले आणि दीक्षितांना तुम्ही घेऊन चाललांत, पण आमची हुंड्याची रक्कम ?

**कोतवाल :** घ्या, दीक्षिताकडून घ्या.

**कांचन :** दीक्षित, हुंड्याची रक्कम टाका आणि मग चला कुठें ते.

कोतवाल दीक्षिताला घेऊन गेला आणि त्यांच्या मागोमाग 'हुंडा' 'हुंडा' करीत कांचनभट गेला.

शारदेची आई इंदिरा त्या ठिकाणीं आली आणि शारदेला पोटाशीं धरून 'देवा, ह्या माझ्या एवढ्याशा निरपराधी पोरीवर एवढा दुःखाचा पर्वत लोटून दिलास, ह्यांत काय न्यायीपणा दाखवलास, तुझा तुलाच ठाऊक !' असें म्हणाली.

**शारदा :** आई, हा काय गोंधळ आहे तो तरी मला सांग.

मी समजुं तरी काय भुले मन । पडति अक्षता शिरिं न
तोंचि हें उद्भवलें मधिं काय कळेचि न ॥ ध्रु० ॥ हासुं

काय सुटलें मी म्हणुनी । का रडुं हे मस्तक पिटुनी ॥
लग्न होय कीं कुंवार अज्ञुनी । हरहर देवा काय
विडंबन ॥ १ ॥

इंदिरा : घरांत चल, तुला सर्व सांगतें. (जातात.)

कोदंड : मित्रा हिरण्यगर्भा, केवढा अंध अविचारी मी! उपकारसुद्धा विचारानेंच केला पाहिजे, नाहींतर तोच अपकार होतो म्हणतात, तें आज माझ्या प्रत्ययाला आलं. ह्या शारदेचं कल्याण करण्याच्या बुद्धीनें मीं हें काय केलं पाहिलंस? गिधाडापासून हरिणीचं पाडस सोडवलं आणि वणव्यांत टाकलं कीं रे! आतां ह्या प्रसंगांतून एकटी शारदा कसा मार्ग काढील? अरे, पण हे वैद्यबुवा आले. चल आपण आंत जाऊं.

♣



# शारदेंन विवाह करावा

शारदेचें लग्न कोदंडानें मोडलें, पण गांवांतले भिक्षुक व त्यांच्याच तंत्रानें चालणारे ब्राह्मणलोक तिचें लग्न भुजंगनाथाशीं झालें असेंच म्हणूं लागले. कोदंडानें हा सर्व प्रकार शंकराचार्यांना कळविला. जगद्गुरूंनीं असें आज्ञापत्र काढलें कीं ‘सप्तपदी झाल्यावांचून विवाह पूर्ण होत नाहीं.’ नुसतें आज्ञापत्र काढून भागणार नाहीं, असें शंकराचार्यांस वाटल्यामुळें त्यांनीं असेंही जाहीर केलें कीं ‘ब्राह्मणांनीं धर्मसंबंधांत बंडाळी करणें इष्ट नाहीं. हें आज्ञापत्र मान्य न केल्यास इकडून विलंब न लागतां योग्य तो विचार होईल.’

हिरण्यगर्भाकडून ही हकीकत ज्या वेळीं इंदिराकाकूला कळली, तेव्हां ती म्हणाली, ‘हें इतकं सारं कोदंडानीं केलं ना? देवा, त्यांना उदंड आयुष्य दे आणि त्यांच्या हातून तरी माझ्या शारदेवरचं एवढं अरिष्ट दूर करीव.’

भुजंगनाथाबरोबर होणारें लग्न मोडलें, एवढ्यानें शारदेचा प्रश्न सुटत नव्हता. तिच्या लग्नाचा हा असा प्रकार झाल्यामुळें तिला

दुसरा कोणताही ब्राह्मण वर मिळणें फार बिकट होतें. कोदंडाचें लग्न झालेलें नसल्यामुळें त्यानेंच शारदेशीं लग्न करावें असें इंदिरेच्या मनांत आलें आणि हिरण्यगर्भाला ती म्हणाली, "एवढं जर घडवून आणलंत तर बहिणीच्या हातांत तुम्हीं चुडे घातल्यासारखं होईल."

कोदंडापुढें बिकट पेंच होता. एक तर, त्यानें आजन्म अविवाहित राहावयाचा संकल्प केला होता. ह्यांतून निसटावयास मार्ग होता; कारण त्यानें हा संकल्प कोणाजवळ जाहीर केला नव्हता. दुसरें असें कीं त्यानें जो शारदेचा विवाह म्हाताऱ्याशीं होऊं नये म्हणून प्रयत्न केला, तो एक पवित्र कर्तव्य म्हणून केला होता; पण जर तो तिच्याबरोबर लग्न करावयास तयार झाला असता, तर सुंदर स्त्रीवर भाळून तिच्याशीं लग्न करण्याची संधि आपणास मिळावी म्हणून त्यानें ही सगळी खटपट केली असेंच लोक म्हणाले असते. सुवर्णशास्त्र्यानें तर तसें म्हटलेंही. अशा पेंचांत कोदंड सापडला.

शारदेची स्थिति तर अत्यंत केविलवाणी झाली होती. तिला जवळजवळ अज्ञातवासांतच राहावें लागत होतें. आपलें लग्न आतां होणें शक्य नाहीं, एक कोदंडच आपल्याशीं लग्न करूं शकेल, पण त्याच्यापाशीं गोष्ट काढणें शक्य नाहीं अशी शारदेची खात्री झाल्यामुळें तिनें आत्महत्या करावयाचा निश्चय केला. ती अशा परिस्थितींत सापडली होती कीं तिला दुसरा मार्गच दिसत नव्हता. एके दिवशीं पहाटे तिनें कोणालाही दाद लागूं न देतां स्मशानाचा मार्ग धरला. त्या स्मशानाजवळच नदींतील डोह होता. तेथें उडी टाकावयाची असा निर्धार करून ती त्या ठिकाणीं येऊन पोचली. तिला जगाचा निरोप घ्यावयाचा होता.

शारदा : इतका निर्धार केला, तरी अजून आईकडे मन धावतं. मी नाहींशी झालें असं कळेल, तेव्हां बिचारी दुःखानें धायधाय करील. पण जाऊं दे. मायेनंच मनुष्य फसतं. देवा, माझ्या आईला, बाबांना नि जयंताला माझा विसर लौकर पडेल असं कर. माझं कल्याण व्हावं म्हणून ते कोदंड किती झटले, त्यांना सुखी ठेव.

असें बोलून शारदा डोहांत उडी घेणार, इतक्यांत कोदंड त्या ठिकाणीं येऊन पोचला आणि तिला त्यानें अडविलें. आपणाला मरणसुद्धा बिनबोभाट येत नाहीं असें वाटून ती आपल्या दैवाला दोष देऊं लागली.

कोदंड : शारदे, तूं मला ओळखलंस का ?

शारदा : हो आतां ओळखलं. आपण इथें अकस्मात् कसे आलांत ? माझ्या दुर्दैवानं कीं सुदैवानं ?

कोदंड : तुझ्या माझ्या उभयतांच्याही सुदैवानें.

शारदा : माझं स्वप्न खरं होणार तर मग ! आपला स्वप्नावर विश्वास आहे का ?

कोदंड : अगदीं निदिध्यास लागलेल्या गोष्टीविषयींच्या स्वप्नांतलीं कांहीं स्वप्नं क्वचित्कालीं अंशतः खरीं होतात. तुला कोणतं स्वप्न पडलं होतं सांग पाहूं.

शारदा : अशी अडीच तीन तास रात्र राहिली असेल आणि माझा डोळा लागून असं स्वप्न पडलं कीं मी जीव देण्याकरतां नदीवर आलें आणि उडी घेणार इतक्यांत आपण येऊन माझं असंच पाणिग्रहण केलंत.

कोदंड : झालं तर, शारदे, हें स्वप्न इतकंच खरं व्हायचं होतं.

शारदा : काय म्हटलंत ?

कोदंड : असं वाईट वाटूं देऊं नकोस. कारण जगद्गुरूंनीं तुझ्याकरतां जो वर निश्चित केला आहे, तो एक तरुण, विद्वान्, श्रीमंत...

शारदा : नको नको, तो मेला भयंकर शब्द मला ऐकायलासुद्धा नको. त्याच्याच पायीं माझी अशी दशा झाली. बरं, आणखी एकदा मी आपणाला विचारतें, कीं नाहीं ना माझं सगळं स्वप्न खरं होत ?

कोदंड : कांहीं महत्कार्यासाठीं मी अविवाहित राहाण्याचा संकल्प केला आहे, तो मला मोडतां येत नाहीं.

शारदा : मग, माझा निर्धार मला मोडतां येत नाहीं. सर्वस्वी आपली झालेली ही काया भलत्याच्याच सेवेंत झिजवायची, त्यापेक्षां माशांनीं खाल्लेली काय वाईट ! माझा शेवट असा कां झाला हें जगाला नीट समजावून सांगा. येतें मी आतां. ( नदींत उडी टाकूं लागते. )

कोदंड : शारदे, हें काय ? मी तुझं पाणिग्रहण करतों, पण हें साहस करूं नकोस.

शारदा : त्या उगवत्या सूर्यनारायणासमक्ष वचन दिल्याशिवाय मला खरं वाटायचं नाहीं.

कोदंड : बरं तर.

घेईं मम वचन हें सुगुणमणिमंजिरी ॥ ध्रु० ॥
साच तुज वरिन मी भंगुनिहि मन्नियम ॥
साक्षि अरुणाक्षि, तो विश्वसाक्षी करी ॥ १ ॥

तो पाहा शिंगाचा ध्वनि ऐकूं येतो. जगद्गुरूंची स्वारी आली वाटतं ! अहाहा, शारदे, सुप्रभातकाल म्हणजे मंगलकारक खरा !

हा बाल दिवाकर करीं । अंधकारा हरी ।
दुःख वारी दुरी । बघ तुझेंहि ॥ ध्रु० ॥
चल शंकरगुरुसन्निधीं । थोर करुणानिधी ।
प्रणत होउनि पदीं । कळवुं हेंहि ॥ १ ॥

शारदा : मी तयार आहें.

खुद्द जगद्गुरु शंकराचार्यांची स्वारी गंगापुरांत आली. क्षेत्रांतील ब्राह्मणवृंदाची त्यांच्याबरोबरच्या प्रमुख शिष्योत्तमानें

समजूत केली. ज्या हेरंब महालाच्या तळघरांत कोदंडाला अन्नपाण्यावांचून कोंडून ठेवण्यांत आलें होतें, त्याच हेरंब महालांत शारदा आणि कोदंड ह्यांचा विवाह लावण्यांत आला. कांचनभट वेडा झाल्यामुळें कन्यादान शारदेच्या मामानें केलें. हें काम मामानें हौसेनें केलें, कारण त्याच्या मनांत भुजंगनाथाशीं शारदेचा विवाह होतां कामा नये असेंच होतें.

भुजंगनाथाची आयुष्याची दोरी बळकट होती. त्याला वैद्यबुवांनीं मृत्यूच्या दाढेंतून ओढून काढलें. त्याला उपरति झाली आणि त्यानें शारदा-कोदंड ह्यांच्या विवाहाला हेरंब महालांत जागा दिली इतकेंच नव्हे, तर स्वतः विवाहप्रसंगीं तो हजरही राहिला. नंतर त्यानें शंकराचार्यांचें दर्शन घेतलें आणि सांगितलें, 'आतां अर्धी संपत्ति धर्मार्थ आणि अर्धी पुतण्याला देऊन संन्यासी होऊन काशीवास करावा अशी इच्छा आहे.' शंकराचार्यांनीं ह्या इच्छेबद्दल भुजंगनाथाचें अभिनंदन केलें. इतक्यांत शारदा आणि कोदंड सप्तपदी पुरी करून शंकराचार्यांना नमस्कार करावयास आलीं.

**शंकराचार्य :** कोदंड, आजपासून तुम्ही गृहस्थाश्रमी झालांत. ह्या आश्रमाचे धर्म तुम्ही जाणतांच आहां, परंतु हेंही ध्यानांत ठेवा.

**कोदंड :** काय ती आज्ञा व्हावी.

**शंकराचार्य :** गृहलक्ष्मी ही स्त्री बहुमान्या सांभाळीं प्रेमानें ।
तसेंच शारदे,

परम पूज्य पतिदैवत तुज हें पूजिं यास नेमानें ।
गृहसुख तुम्हि घ्यावें । त्यांतचि परसुख साधावें ॥ १ ॥

**कोदंड :** जगद्गुरूंची आज्ञा शिरसावंद्य आहे.

**वल्लरी :** गडे शारदे, 'तुला योग्य पति मिळेल' असं आश्वासन कोदडांनीं तुला संगमनाथाच्या देवळांत दिलं होतं, तें त्यांनीं खरं केलं ना?



शारदा : आतां काय, कराल तेवढी थट्टा थोडीच आहे.

शारदा : आतां काय, कराल तेवढी थट्टा थोडीच आहे.

शंकराचार्य : अहो भट्टाचार्यप्रमुख, आम्हीं ह्या कोदंडपंडितांस ह्या प्रांताचे धर्माध्यक्ष व हिरण्यगर्भास त्यांच्या साहाय्यास नेमिलें आहे. तरी सर्वांनीं त्यांच्या धर्माज्ञेंत वागून, त्यांचा योग्य असा मान ठेवावा.

सर्व जमलेले ब्राह्मण : जगद्गुरूंची आज्ञा आम्हांला प्रमाण आहे.

कोदंड : आमची योग्यता ती काय आणि हा अधिकार केवढा !

शंकराचार्य : असो. जगदीशानें आणखी तुमचं कोणतं इष्ट करावं

कोदंड :

जरठें न विवाह करावा । कधिंहि न जनकें जरठ
वरातें तनुजादेह विकावा ॥ ध्रु० ॥ ही भवदाज्ञा
जो नच पाळी । महापातकी स्वकुळा जाळी ।
लोकनियमनास्तव तत्काळीं । भूपें तो दंडावा ॥ १ ॥

शंकराचार्य : तथास्तु ! तथास्तु ! तथास्तु !

RRMRBK-0204328

म. ग्रं. सं. पुणे, ग्रंथालय शाखा.
क्र. 832 नों. दि.
दा. क्र.
वि. ग्रा. ना.